रे.क.नं.१८९/२०१३

# नि. क्र. ५ वरील आदेश

प्रस्तुतचा दावा वाटणी व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादी क्र. १ विरुध्द त्याने वादीच्या दावा मिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून तुर्तातुर्त मनाई अनुतोष मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे -

मौजे बानगे ता. कागल येथील खालील शेतजमीनी दावा मिळकती आहेत.

| अ. नं. | गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | १५०४/३० | ०-१५ | २-०० |
| २ | १५०४/२५ | ०-०१ | ०-१२ |
| ३ | १५०४/२० | ०-०२ | ०-२५ |
| ४ | १५०४/१५ | ०-२३ | ०-०३ |
| ५ | १५०४/१३ | ०-१३ | १-६९ |
| ६ | १४९९ | ०-०४ | ०-३७ |
| ७ | १४९५ | ०-०१ | ०-०९ |
| ८ | १४५९ | ०-१५ | १-६२ |
| ९ | १४८९ | ०-१८ | २-०६ |
| १० | १४५७ | ०-५४ | ०-८७ |
| | | पो. ख. ०-०७ | |
| ११ | १२४७/अ | ०-१५ | २-४४ |
| १२ | ११४० | ०-०१ | .-०६ |
| १३ | ११४४ | ०-१२ | १-२५ पै.८ आणे |
| १४ | १२४७/ब | १-१४ | ३-८१ |
| १५ | १५४८ | ०-०६ | ०-४४पैकी समाईक हिस्सा |
| १६ | १५०५/ब | ०-०६ | ०-६२ |
| १७ | १५०५/अ | ०-३३ | ३-३७ |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | १५१६ | ०-२० | १-८७ |
| १९ | १५०४/९ | ०-०२ | ०-२५ |
| २० | १५३७ | ०-१५ | १-५३ |
| २१ | १५४३ | ०-२७ | २-७८ |
| २२ | ११४१ | ०-०६ | ०-४७ पै.८ आणे |
| | | पो.ख. ०-०२ | |
| २३ | १५४५ | १-०३ | ११-३१ |
| २४ | १५०४/४ | ०-०४ | ०-५३ |

३. तसेच मौजे बानगे ता. कागल येथील ग्रा. पं. मि. नं. २५२, ३००, २९५ ५५६/1 या घर मिळकती व खुल्या जागा, तसेच गट नं. १४५९ व १५४५ मधून गेलेली पाण्याची पाईपलाईन याही या दाव्याच्या वाद मिळकती आहेत. सबब येथून पुढे संक्षेपाकरीता सदर मिळकतींना दावा मिळकती असे संबोधणेत येत आहे.वादीचे म्हणणे प्रमाणे वादी प्रतिवादींच्या घराण्याचा मुळ पुरुष गणपतराव होता. त्यास शंकरराव, जीवनराव, रामराव व प्रतिवादी क्र. १ वसंतराव अशी चार मुले वारस होती. शंकरराव, जीवनराव व रामराव मयत आहेत. जीवनरावची पत्नी इंदुमती ही सुध्दा मयत आहे. वादीचे म्हणणेप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ हे एकत्र कुटुंबाचे सदस्य असून दावा मिळकती या त्यांच्या वडिलोपार्जित हिंदु एकत्र कुटुंबातील आहेत. तसेच वादी प्रतिवादी मध्ये दावा मिळकतीच्या अनुषंगाने सरसनिरसमानाने वाटप झालेले नाही. वादीचा दावा मिळकतीमध्ये समदायाद या नात्याने सामाईक हिस्सा व हक्क आहे. वादी प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये उस, भुईमुग, सोयाबीन या सारखी पीके घेत असतात. प्रतिवादी क्र. १ हा गावातील प्रतिष्ठीत इसम असल्यामुळे त्याचे नावावर साखर कारखान्याकडे उस पाठविला जातो व त्यानंतर त्या उसाची बिले वाटून घेत असतात. दावा मिळकतीमध्ये वादीचा १/१२ व प्रतिवादी क्र. १ व २ यांचा प्रत्येकी १/३ हिस्सा आहे. प्रतिवादी क्र. १ व त्याचा मुलगा चंद्रशेखर याने कि. दि. अ. नं. ७/२०१३ चा अर्ज जीवनराव व इंदुमती यांचा वारसा दाखला मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे कामी वादीने हरकत घेतल्यामुळे सदरचा अर्ज कोल्हापूर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात वर्ग करणेत आलेला आहे. सदर गोष्टीचा राग मनात ठेवून प्रतिवादी क्र. १ ने वादीच्या दावा मिळकतीमधील समाईक कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा चालू केलेला आहे. म्हणून आक्टोंबर महिन्यापासून वादी हा प्रतिवादी क्र. १ याचेकडे त्याचे हिस्सेची मागणी करीत आहे. परंतु प्रतिवादी क्र.१ याने वाटणी करुन देण्यास नकार दिल्यामुळे वादीने त्याचे

वकिलामार्फत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दि. २९/१०/२०१३ रोजी नोटीस पाठविली होती. परंतु प्रतिवादींनी सदर नोटीसीस चुकीचे उत्तर देवून सन १९७६ मध्ये तसेच दिनांक ०२/१२/१९९६ रोजी वाटणी झाल्याचे खोटेपणाने नमूद केलेले आहे. वादीने प्रतिवादीच्या हक्कात कोणतेही वाटणीपत्र लिहून दिलेले नसून तसे वाटणीपत्र वादीस मान्य व कबूल नाही. वादीचे म्हणणेप्रमाणे केवळ सोयीसाठी वादी प्रतिवादींच्या नावाच्या नोंदी दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी आणेवारीने झालेल्या आहेत. परंतु प्रतिवादी क्र. १ हा वादीच्या दावा मिळकतीमधील समाईक कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत असल्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल कलेला आहे.

४. प्रतिवादी क्र. १ याने सदर कामी हजर होवून नि. क्र. १७ येथे त्याची कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादीने दावा मिळकती वडिलोपार्जित असलेचे तसेच वादी प्रतिवादीमधील नातेसंबंध मान्य केलेले आहेत. प्रतिवादीचे म्हणणेप्रमाणे वादीने दावा मिळकतींचे चुकीचे व अपूर्ण वर्णन नमूद केलेले आहे. तसेच वादीने, वादी प्रतिवादींची संपूर्ण वंशावळ नमूद केलेली नाही. प्रतिवादीचे पुढील कथनानुसार मुळ पुरुष गणपतराव यास सरोजीनी नावाची मुलगी होती व तिचा विवाह कोल्हापूर येथील पांडूरंगराव राणे यांचेसोबत झाला होता. सरोजीनी मयत झालेली आहे. परंतु वादीने सरोजीनी हिच्या वारसांना सदर दाव्याचे कामी सामील करुन घेतलेले नाही व सदरची बाब न्यायालयात लपवून ठेवलेली आहे. वादीने दावा मिळकतींचा अपूरा तपशील देवून योग्य कोर्ट फी लावलेली नसल्यामुळे दावा कोर्ट फी नसलेचे तांत्रीक मुद्यावरुन चालणेस पात्र नाही. प्रतिवादीचे म्हणणेप्रमाणे त्याने व त्याचा मुलगा चंद्रशेखर याने इंदुमती हिच्या इच्छेप्रमाणे तिचा वारस दाखला मिळणेकरीता किरकोळ अर्ज क्र. ७/२०१३ दाखल केला असून तो कोल्हापूर येथील दिवाणी न्यायालय व. स्तर येथे प्रलंबित आहे. प्रतिवादीच्या पुढील कथनानुसार दिनांक १५/२/१९७६ रोजी वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे दरम्यान वाटणीपत्र होवून दावा मिळकतींची वाटणी झालेली आहे. परंतु या वाटणीची नोंद सिटीसव्हे कार्यालयाकडे झालेली नाही. प्रतिवादीचे म्हणणेप्रमाणे सदर वाटणीपत्राप्रमाणे वादी प्रतिवादी दावा मिळकतींच्या प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीत आहेत. सदर वाटणीपत्रामध्ये वादी प्रतिवादींनी शेतमिळकतीमध्ये आणेवारी प्रमाणे स्वतंत्र नोंदी करुन त्याप्रमाणे वहिवाट करणेचा तसेच नदीच्या पाण्यावर वहिवाटीत असलेल्या क्षेत्रामध्ये आळीपाळीने उसाचे पिक घेणेचे ठरले होते. सदर वाटणीपत्राने घर मिळकत क्र. ३२२ ही जीवनराव व नानासो यांचे वाटणीस, घर मिळकत क्र. ३७२ विलासराव व रणजीत यांचे वाटणीस तर घर मिळकत क्र. ६७९ ही प्रतिवादी क्र.१ चे वाटणीस दिलेली होती. तसेच प्रतिवादी क्र. १

यास एक बैल, एक गाय, एक म्हैस, रेडी, बैलगाडी व शेतीची अवजारेही वाटून दिली होती. सदर वाटणीपत्रावर नानासो शंकर सावंत, जीवनराव सावंत, वसंतराव सावंत वादी रणजीत याने वाटणीपत्र लिहिणार म्हणून व पांडूरंग गणपती पाटील व ज्ञानदेव मेथे याने साक्षीदार म्हणून सहया केलेल्या आहेत. सदर साक्षीदारापैकी ज्ञानदेव मेथे हा मयत आहे. वादीस सदर वाटणीपत्राची जाणीव असतानाही त्याने विनाकारण खोटया दाव्याची रचना केलेली आहे. दिनांक १५/२/१९७६ रोजी वाटणीपत्र झालेले असतानाही वादी रणजीत याने पुन्हा वाटणीपत्र लिहून ठेवण्याचा आग्रह धरला म्हणून दिनांक २/१२/१९९६ रोजी नानासो, जीवनराव, वसंतराव, विलास, वादी रणजीत, शकुंतला रामराव सावंत यांनी पुन्हा वाटणीपत्र लिहून ठेवले आहे. सदर वाटणीपत्राप्रमाणे रामराव याचे वारस म्हणजेच रणजीत, विलास व शकुंतला यांचे वाटणीस गट नं. १५४३ ची संपूर्ण मिळकत, गट क्र. १४५९ ची पूर्ण जमीन, गट क्र. १५०४/३० मधील १/२ हिस्सा, गट नं. १२४७ अ व ब मधल १/३ हिस्सा व जीवनराव याच्या नावावर असलेली घर मिळकत वाटून दिली. सदर वाटणीपत्रावर नामदेव पाटील याने दस्तुर म्हणून सही केलेली असून साक्षीदार म्हणून रघुनाथ बोंगार्डे व महादेव भाउ पाटील यांनी सहया केलेल्या आहेत. प्रतिवादीच्या म्हणणेप्रमाणे दिनांक १५/२/१९७६ व २/१२/१९९६ रोजी वाटप होवून वादी प्रतिवादींच्या स्वतंत्र वहिवाटी झालेल्या आहेत. सदर वहिवाटीप्रमाणे वादी प्रतिवादी घरफाळा, शिक्षण कर भरत आलेले आहेत. दिनांक २/१२/१९९६ रोजीचे व दिनांक १५/२/१९७६ रोजीचे वाटणीपत्राप्रमाणे गट क्र. १४५७ हा प्रतिवादी क्र. १ याच्या वाटणीस आलेला असून प्रतिवादीने सदर गट नंबरमधील जुने घर पाडून त्या ठिकाणी नविन आर.सी.सी घर वैयक्तीक उत्पन्नातून बांधलेले आहे. त्यामुळे सदर मिळकतीशी वादीचा कोणताही संबंध नाही. वाटणीप्रमाणे वादी प्रतिवादी हे त्यांच्या जमीनीमध्ये स्वतंत्र उस पिके करीत असून तो उस साखर कारखान्याकडे पाठवित आहेत. प्रतिवादी क्र. १ चे म्हणणेप्रमाणे गट क्र. १४५९ व १५४५ मधून गेलेली पाण्याची पाईपलाईन ही प्रतिवादी क्र. १ च्या मालकी कब्जेवहिवाटीची आहे. प्रतिवादीचे म्हणणेप्रमाणे वाटणी झाल्यानंतर त्याचा मुलगा चंद्रशेखर याने गट क्र. १५४५ व १४५७ च्या जमिनीत सुधारणा केली आहे. परंतु वादीने त्याच्या वाटणीस आलेल्या जमिनी पाडून ठेवलेल्या आहेत. प्रतिवादीचे म्हणणेप्रमाणे दावा मिळकतीचे वाटप होवून वादी प्रतिवादींच्या स्वतंत्र कब्जेवहिवाटी चालू आहेत. त्यामुळे वादी प्रस्तुतचा दावा दाखल करुन प्रतिवादी क्र.१ याचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई अनुतोष मिळणेस अपात्र आहे. सबब प्रतिवादीने वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. वादी प्रतिवादींच्या परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचाराधीन निघतात. त्यावरील माझे निष्कर्ष त्याखाली दिलेल्या कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस त्याच्या बाजुने उपलब्ध असलेचे सिध्द करतो का ? | नाही |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या हक्कात आहे का ? | नाही |
| ३ | प्रस्तुतचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे ? | नाही |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

<u>कारणमिमांसा</u>

६. वादींनी आपली केस सिध्द करण्यासाठी नि. क्र. ३ चे कागद यादीसोबत बानगे येथील गट नं. १५०४/३०, १५०४/२५,१५०४/२०, १५०४/१५, १५०४/१३, १४९९, १४९५, १४५९,१४८९, १४५७, १२४७/अ, ११४०,११४४,१२४७/ब, १५४८, १५०५/ब, १५०५/अ, १५१६, १५०४/९, १५३७, १५४३, ११४१, १५४५, १५०४/४ चे ७/१२ उतारे नि. क्र. ३/1 ते ३/२४ येथे, तसेच ग्रामपंचायत मिळकत क्र. २१५, ५५६/१, ३००, २५२ नि. क्र. ३/२५ ते २८ येथे, वादीने प्रतिवादीला पाठविलेली नोटीस नि.क्र. ३/२९ येथे, प्रतिवादी क्र. १ ने नोटीसीस दिलेले उत्तर नि. क्र. ३/३० व प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी नोटीसीस दिलेले उत्तर नि. क्र. ३/३१ येथे दाखल केले आहेत. तसेच गट नं. ५६७ चा डायरी उतारा नि. क्र. २३/१ येथे, किरकोळ अर्ज नं. ७/२०१३ च्या अर्जाची प्रत नि. क्र. २३/२ येथे , किराकोळ अर्ज नं. ७/२०१३ मधील वि. प. चे म्हणणे नि. क्र. २३/३ येथे, बानगे येथील १४०४ व १४०३ चा डायरी उतारा नि. क्र. २३/५ व ६ येथे व लाईट बील पावत्या नि. क्र. २३/६ ते १० येथे दाखल केले आहे. तसेच वादीने त्याच्या अभिकथनांच्या पुष्ठयर्थ स्वतःचे शपथपत्र १९ येथे, साक्षीदार रावसो आण्णासो सावंत याचे शपथपत्र नि. क्र. २१ येथे दाखल केली आहेत.

७. प्रतिवादी नं. १ ने त्याचे म्हणणेच्या पुष्ठयर्थ नि. क्र २९ चे कागद

यादीसोबत वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान झालेले दि. १५/२/१९७६ चे वाटणीपत्र नि. क्र. २९/१ येथे, वादी प्रतिवादी यांचे दरम्यान झालेले जमीन व घर यांचे वाटणी पत्र नि. क्र. २९/२ येथे, दुधगंगा वेदगंगा यांचेकडील टनेज पावतीचा संच नि. क्र. २९/३ व ४ येथे, दुधगंगा वेदगंगा सह. साखर कारखाना यांनी दिलेल्या बिलाच्या पावत्या नि. क्र. २९/५, ७ ते १० येथे व कागल तालुका सह. साखर कारखाना यांनी दिलेले उस अडव्हॉन्स बिल नि. क्र. २९/६ येथे, लाईट बील पावती नि. क्र. २९/११ येथे, घर फाळयाच्या पावत्या नि. क्र. २९/१२ व १३ येथे, बॅंक ऑफ महाराष्ट्र म्हाकवे यांचेकडून घेतलेले पिक कर्ज नि. क्र. २९/१४, पाटबंधारे विभागाने दिलेली पाणीपट्टी पावती नि. क्र. २९/१५ ते २३ येथे व दावा मिळकतीचे कलर फोटो नि. क्र. २९/२४ ते २८ येथे दाखल केले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ३ ने नि. क्र. २७ चे कागद यादीसोबत पाटबंधारे विभागाने दिलेली पाणीपट्टी पावती नि. क्र. २७/१ येथे, दुधगंगा वेदगंगा कारखान्याकडील उस वजन पावती नि. क्र. २७/२ व ३ येथे, एस.डी.ओ करवीर यांचा आदेशाची प्रत नि. क्र. २७/४ येथे, दुधगंगा वेदगंगा साखर कारखान्याकडे दिलेला अर्ज नि. क्र. २७/५ येथे, खाते नं. ८८९ चा उतारा नि. क्र. २७/६ येथे व दिनांक २/१२/१९९६ चे वाटणी पत्र नि. क्र. २७/७ येथे दाखल केले आहेत. प्रतिवादी नं. १ ने त्याच्या कथनाच्या पुष्ठयर्थ श्री. प्रतापसिंग विश्वास सावंत, श्री. पांडूरंग गणपती पाटील, श्री. शंकर रावू हिरुगडे व श्री. महादेव भाउ पाटील यांची शपथपत्रे नि. क्र.३० ते ३३ येथे दाखल केलेली आहेत.

.

८. प्रस्तुत प्रकरणी विवादीत मुद्यांचे अवलोकन करण्यापूर्वी मान्य असलेल्या गोष्टी नमूद करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी प्रतिवादींनी दावा मिळकती या वडिलोपार्जित असलेचे व गणपतराव हा मुळ पुरुष असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच वादी प्रतिवादींनी आपसातील नातेसंबंधही मान्य केलेले आहेत. सबब या मान्य असलेल्या गोष्टींच्या पाश्वभुमीवर विवादित मुद्यांचे अवलोकन करणे योग्य होईल्.

<u>मुद्दा क्र. १ ते ३ बाबत</u>

९. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे अनुतोष मिळणेकरीता वादीने तीन प्रमुख घटक सिध्द करणे आवश्यक आहे. पहिला प्रथमदर्शनी केस, दुसरा न्यायाचा तराजू वादीचे हकात आहे आणि तिसरा अर्ज नामंजूर केलेस वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. वादीचे म्हणणेप्रमाणे दावा मिळकतींचे वादी प्रतिवादीमध्ये सरस निरस मानाने वाटणी झालेली नसून वादीची समदायद या

नात्याने दावा मिळकतीमध्ये सामाईक कब्जेवहिवाट आहे. याउलट प्रतिवादी क्र. १ याचे म्हणणे प्रमाणे दिनांक १५/२/१९७६ व दिनांक २/१२/१९९६ रोजी वाटणीपत्र होवून वादी व प्रतितवादी क्र. १ ते ५ यांच्यामध्ये दावा मिळकतींच्या वाटण्या होवून ते दावा मिळकतींच्या स्वंतत्र कब्जेवहिवाटीत आहेत. हिंदु अलिखित कायद्यातील तरतुदीनुसार हिंदू कुटुंब व हिंदु एकत्र कुटुंबाच्या मिळकती एकत्रात आहेत असे गृहीतक आहे. त्यामुळे वादी प्रतिवादीमध्ये दिनांक १५/२/१९७६ व दिनांक २/१२/१९९६ रोजी दावा मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटणी झाली आहे असे प्रथमदर्शनी दाखवून देण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र. १ याचेवर आलेली आहे. प्रतिवादीचे विधिज्ञ श्री. ए.पी. पाटील यांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ याने दिनांक १५/२/१९७६ व दिनांक २/१२/१९९६ रोजी झालेल्या वाटणी पत्राच्या प्रति तसेच सदर वाटणी पत्राप्रमाणे वादी प्रतिवादी मिळकतींच्या स्वतंत्र कब्जेवहिवाटीत आहेत असे दाखविण्याकरीता उस लावणीचे उतारे व उस बील पावत्या दाखल केलेल्या आहेत. विधिज्ञांनी पुढे असा युक्तीवाद केला की, प्रथमदर्शनी या सर्व कागदपत्रावरुन वादी प्रतिवादीमध्ये वाटणी झाल्याची बाब स्पष्ट होत आहे. विधिज्ञांच्या या युक्तीवादाच्या अनुषंगाने मी संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १ याने नि. क्र. २९/१ येथे दिनांक १५/२/१९७६ रोजीचे वाटणीपत्र दाखल केलेले आहे. सदर वाटणी पत्रावरुन असे दिसून येत आहे की, तुकडेबंदी व तुकडेजोड कायद्याच्या अंमलबजावणीमुळे गटांची विभागणी करता येत नसल्याचे महसूल अधिका-यांनी सांगितल्यामुळे तसेच सर्व गट नंबरमधील जमीनी एकाच प्रतीच्या नसल्यामुळे झालेल्या आणेवारीच्या नोंदीप्रमाणे वहिवाट करावी. शेत मिळकती व्यतिरिक्त घर मिळकत क्र. ३२२ जीवनराव व नानासो व घर मिळकत क्र. ३७२ विलास व रणजीत रामराव सावंत यांना आणि घर मिळकत क्र. ६७९ वसंतराव यास दिलेचे नमूद केलेले आहे. सदर वाटणीपत्राच्या कागदावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येत आहे की एकत्रीकरणानंतर ज्या वादी प्रतिवादींच्या नावाच्या नोंदी आणेवारीने दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी नमूद झाल्या होत्या आणि त्या नोंदीप्रमाणे वहिवाट करावी असे ठरले. काही क्षणाकरीता दिनांक १५/२/१९७६ रोजी वादी प्रतिवादीमध्ये वरील प्रमाणे वाटप झाले होते असे मान्य केलेस दिनांक २/१२/१९९६ रोजी पुन्हा वाटणीपत्र करण्याचे कोणतेही कारण नाही. प्रतिवादी क्र. १ चे म्हणणेप्रमाणे वादी रणजीत याने केलेल्या अर्जामुळे दिनांक २/१२/१९९६ रोजी पुन्हा वाटणीपत्र लिहून घेतले. या अनुषंगाने प्रतिवादी क्र. १ याने सदर दिनांक २/१२/१९९६ रोजीच्या वाटणीपत्राची प्रत नि. क्र. १९/२ येथे दाखल केलेली आहे. सदर वाटणीपत्रावरुन असे दिसून येत आहे की वादी रणजीत, त्याचा भाउ विलास व आई शकुंतला यांना घोडयाचे मानकांड व मंजुळा काकीचा ओपा,

कोंडारामधील गवती पडीपैकी १/२ हिस्सा व धारुड शेतातील १/३ हिस्सा, गावठाण्यातील चावडी गल्लीतील रहाते घर वाटून दिलेचे नमूद केलेले आहे. प्रतिवादी क्र. १ याने त्याच्या कैफियतीमध्ये गट क्र. १५४३ म्हणजे घाडयाचे मानकांड, गट नं. १४५९ ज्याचे नाव मंजुळा काकीचा ओपा, गट क्र. १५०४/३० ज्याचे नाव कोंडार व गट क्र. १२४७ अ व ब ज्याचे नाव धारुड असलेचे नमूद केले आहे. दिनांक २/१२/१९९६ रोजीच्या वाटणीपत्रामध्ये गट क्र. १५४३, १४५९ मधील अर्धा हिस्सा रणजीत व त्याच्या कुटुंबास वाटून दिल्याचे नमूद केले आहे. परंतु प्रतिवादीने त्याच्या कैफियतीमध्ये सदरचे संपूर्ण गट वादीस वाटून दिलेचे नमूद केले आहे. तसेच वाटणीपत्रानुसार जीवनराव सावंत यास शिवनेचे मानकांड या जमिनीतील १/२ हिस्सा व कोंडार या जमिनीपैकी पेरावू क्षेत्रापैकी १/२ हिस्सा व धारुड शेतजमिनीपैकी १/३ हिस्सा वाटून दिलेचे नमूद केले आहे. परंतु प्रतिवादी नं.१ ने त्याचे कैफियतीमध्ये जीवनराव यास कोणत्या गटातील जमीनी वाटून गेल्या याबाबत खुलासा केलेला नाही. वादी प्रतिवादींनी मान्य केले प्रमाणे प्रतिवादी नं.१ व त्याचा मुलगा चंद्रकांत यांनी जीवनराव व इंदुमती यांचा वारसा दाखला मिळणेकरीता वारसा अर्ज क्र. ७/२०१३ दाखल केलेला आहे. वादींनी सदर दाखल्याची प्रत नि. क्र. २३/२ येथे दाखल केलेली आहे. सदर वारसा अर्जामध्ये प्रतिवादी क्र. १ याने जीवनराव यास गट क्र. १४५९ पैकी ०-१५ आर क्षेत्र, गट नं. १५४८ पैकी ०-०६ आर क्षेत्र, गट क्र. १२४७/अ पैकी ०-१५ आर क्षेत्र, गट क्र. १२४७/ पैकी १-१४ आर क्षेत्र, गट क्र. १४८९ पैकी ०-१८ आर, गट क्र. १४९५ पैकी ०-०१ आर क्षेत्र, गट क्र. १४९९ पैकी ०-०४ आर क्षेत्र, गट क्र. १५०५/अ पैकी ०-३३ आर क्षेत्र, गट क्र.१५०५/ब पैकी ०-०६ आर क्षेत्र, गट क्र. १५३७ पैकी ०-१५ आर क्षेत्र, गट क्र. १५४३ पैकी ०-२७ आर क्षेत्र, गट क्र. १५४५ पैकी १-०३ आर क्षेत्र व गट क्र.१४५७ पैकी ०-५४ आर क्षेत्र असलेचे नमूद केले आहे. परंतु दिनांक २/१२/१९९६ रोजीच्या वाटणीपत्रामध्ये मात्र या सर्व जमिनींचा उल्लेख नाही. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ याने दोन वाटणीपत्रा विषयी अभिकथन केलेले आहे. परंतु या दोन्ही वाटणीपत्राचा आपसात कोणताही संबंध किंवा एकवाक्यता दिसून येत नाही. या व्यतिरिक्त प्रतिवादी क्र. १ याने त्याच्या कैफियतीमध्ये सदर दोन्ही वाटणीपत्रामध्ये कोणते वाटणीपत्र अंमलात आले व ते कसे योग्य आणि सरसनिरस मानाने वाटणी झालेप्रमाणे आहेत याचा उल्लेख केलेला नाही. प्रतिवादी क्र.१ याचे म्हणणेप्रमाणे गणपती यास सरोजीनी नावाची मुलगी होती. म्हणजेच सरोजीनी हिचा तिच्या वडिलांच्या मिळकतीमध्ये हिस्सा असलेचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. सबब सरोजीनी या दोन्ही वाटणीपत्रापैकी कोणत्याही वाटणीपत्राचे वेळी गैरहजर होती व तिला कोणते वाटणीपत्र मान्य होते याबाबत कोणताही खुलासा प्रतिवादी क्र. १ याने

केलेला नाही. वादी प्रतिवादीतर्फे वाटणी झाली होती ही बाब पुराव्यावरुन ठरणार आहे. दाव्याच्या या प्राथमिक अवस्थेमध्ये वादी व प्रतिवादीमध्ये सरस निरस मानाने वाटप झाले होते ही बाब गृहीत धरता येणार नाही.

१०. वादी प्रतिवादींनी दाखल केलेल्या दावा मिळकतीचा ७/१२ तसेच कर आकारणी उता-यावरुन वादी व प्रतिवादींची नावे दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी आणेवारीने नमूद असलेचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादीने मान्य केल्याप्रमाणे तो एकत्र कुटुंबातील सदस्य असून त्याचे समदायक या नात्याने दावा मिळकतीमध्ये सामुहिक कब्जेवहिवाट आहे. वादीने मान्य केलेल्या या बाबीवरुन असे स्पष्ट होत आहे की, हिंदु एकत्र कुटुंबापैकी एक सदस्य दुस-या सदस्याविरुध्द हरकत अडथळा करु नये अशा आशयाचा तुर्तातुर्त मनाई अनुतोषाची मागणी करीत आहे. हिंदु अलिखित कायद्यातील तरतुदीप्रमाणे हिंदु एकत्र कुटुंबातील सदस्यांचा हिंदु एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमध्ये जन्मापासून अबाधित हक्क निर्माण होतो. अशा परिस्थीतीमध्ये केवळ प्रतिवादी क्र.  हा मागणी करुनही वाटणी करुन देत नाही म्हणून त्याचे विरुध्द मागणीप्रमाणे तुर्तातुर्त मनाई अनुतोष देता येणार नाही.

११. या व्यतिरिक्त वादीने प्रतिवादी क्र. १ हा असे कोणते कृत्य करीत आहे की, ज्यामुळे दावा मिळकतींचे मुळ स्वरुप बदलून दावा मिळकतींना धोका निर्माण होत आहे. तसेच त्याचे कायम स्वरुपी नुकसान होवून त्याची किंमत कमी होत आहे याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही. कायद्यातील तरतुदीप्रमाणे एक समदायक दुस-या समदायकाविरुध्द तसेच एक सहमालक दुस-या सहमालकाविरुध्द हरकत अडथळा करु नये म्हणून तुर्तातुर्त मनाई अनुतोष मिळणेस अपात्र आहे. सबब प्रस्तुत दाव्याचे कामी वादीने त्याचे हितामध्ये प्रथमदर्शनी केस असल्याचे शाबीत केलेले नाही. तसेच न्यायाचा तराजू त्याचे बाजुने झुकल्याचे तसेच त्याचा अर्ज नामंजूर केल्यास त्याचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे हे घटक शाबीत करु शकला नाही. सबब वरील सर्व विवेचनाचा विचार करता मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ४ चे उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

दिनांक – १२/२/२०१४

(मनिषा ना. चव्हाण )
दिवाणी न्यायाधीश, क स्तर, कागल.